**Lecture on Minority Scholarships**

दिव्य मराठी जळगाव सिटी 11-10-2023

# अल्पसंख्याक प्रवर्ग शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्या : प्रशांत मोरे

## नूतन मराठा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन




शहरातील नूतन मराठा महाविद्यालयात मार्गदर्शन करताना प्रशांत मोरे आणि उपस्थित मान्यवर.

**प्रतिनिधी** | जळगाव

अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांच्या संदर्भात नूतन मराठा महाविद्यालयात जनजागृती करण्यात आली. प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांच्या मार्गदर्शनात डॉ. एन. जे. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात हा उपक्रम राबवण्यात आला.

अल्पसंख्याक शिष्यवृत्ती विभागाचे नोडल अधिकारी प्रशांत मोरे हे प्रमुख वक्ते होते. सेंट टेरेसा विद्यालयाच्या प्राचार्याय सिस्टर ज्युली पी. ए., उपप्राचार्या तथा अल्पसंख्याक कक्ष सदस्य प्रा. डॉ. माधुरी पाटील, अल्पसंख्याक कक्ष प्रमुख डॉ. आफाक शेख व्यासपीठावर उपस्थित होते. वक्त्यांचा परीचय प्रा. मुक्ती जैन यांनी करुन दिला. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन मोरे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. गजाला शेख यांनी केले. आभार. प्रा. इम्रान खान यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एस. बी. चव्हाण व प्राध्यापकांनी परीश्रम घेतले.